(5)

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax २२६६१२३९, Tel. २२६६५२३३, Email : collector_mumbaicity@maharashtra.gov.in
**(भूमापन व भूमि अभिलेख शाखा)**


क्रमांक : सीएसएलआर/एसॲण्डएलआर-१ व २/टे-१/कांदळवन तक्रारी/२०१९
दिनांक : २२/०४/२०१९ जा. क्र. 631

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

**विषय** :- कांदळवन संरक्षण व संवर्धन
कांदळवनाचे ऱ्हासाबाबतची संयुक्त पहाणी करणेबाबत.
श्री. ल्यूक मेन्डेस यांचा दि. 22/11/2018 रोजीच्या ई-मेलव्दारा प्राप्त तक्रारीनुसार.
Pollution and Garbage dumping Killing mangroves at Mahim east Mangrove close to the railway tracks.

**संदर्भ** :- 1) निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील पत्र क्र. सी/ कार्या-2/आय/टे- 8/कावि.- को.स.कां.त./18 दि. 14/01/2019 रोजीचे पत्र. (E-mail व्दारे प्राप्त दि.27/02/2019)
2) सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष – 1/ल.ले/139/सन2018-19 फोर्ट, मुंबई 400 001. दि.23/11/2018.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित यांचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. ल्यूक मेन्डेस, यांनी दि.२२/११/२०१९ रोजी कांदळवनाच्या/ पाणथळाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**कांदळवन तक्रारीचा पुर्तता अहवालाचा नमुना**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. ल्यूक मेन्डेस दि.२२/११/२०१८ |
| २. | तक्रारीचा विषय | Pollution and Garbage dumping Killing mangroves at Mahim east Mangrove close to the railway tracks. |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा.स.नं., गावाचे नांव, तालुका. | माहिम महसुल विभाग. |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | तक्रारीच्या अनुषंगाने दि.२०/०३/२०१९ रोजी या कार्यालयातील श्री.बी. व्ही तोरस्कर, परिरक्षण भूमापक, कांदळवन संधारण घटक मध्य मुंबई |

Received 22/4/2019

| | | |
|---|---|---|
| | | यांचेकडील श्री. र. र. मन्सूरी (वनपाल दादर / कुलाबा) व डी. एल. झुगरे (वनरक्षक, दादर) |
| ५. | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | सदर जागा ही माहिम धारावी पुल (Bridge) लगत असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकलेले आढळून आले. डॅब्रीज कोणी टाकले याबाबत स्थानिक रहीवाश्यांकडे चौकशी केली असता, डॅब्रीज हे रात्री उशिरा टाकण्यात येते. असे सांगण्यात आले. सद्यस्थितीत कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही.<br>परंतु सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकले असल्याने ते पुढे पुढे सरकत तिवरांची झाडे जिथे आहेत. तिथपर्यंत पसरलेले आहे. भविष्यात डॅब्रीजचे प्रमाण वाढल्यास डॅब्रीज मुळे झाडांना मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा खंडीत होऊन, झाडे नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रथम त्याठिकाणचे डॅब्रीज हटविणे नितांत गरजेचे आहे. जेणे करुन झाडांना होणारा पाणी पुरवठा सुरळीत राहील. असे इकडील मत आहे.<br>इकडील अभिलेख पहाता, सदर जागा हि माहिम विभागातील असून, सदर जागा खाडीची आहे. त्याला भूकर क्रमांक देण्यात आलेला नाही. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | --- |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तिंची नांवे व पत्ता | --- |
| ९. | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | --- |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत आली असून, यासोबत संयुक्त स्थळपाहणी केली असून, स्थळपाहणी अहवाल, गूगल नकाशा व पंचनामा पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.

(शिवाजी जोंधळे)
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर**

प्रत :-सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय.302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई-400 001.

# स्थळ पहाणी अहवाल

60/2019

भूमापन शाखा
दि. /03/2019

सविनय सादर,

**विषय :-** कांदळवन सरंक्षण व संवर्धन.
कांदळवनाचे ऱ्हासाबाबतची संयुक्त पहाणी करणेबाबत श्री. ल्यूक मेन्डेस यांचा दि.22/11/2018 रोजीच्या ई-मेलद्वारे प्राप्त तक्रारीनुसार.

**संदर्भ :-** या कार्यालयाकडील ज्ञाप क्र. सीएसएलआर/एसअॅन्डएलआर /1 व 2 /टे-1/ कांदळवन ऱ्हास / संयुक्त स्थळपहाणी /2019 दि. 06/03/2019 चे पत्र.

उपरोक्त विषयांकित कामी दि. 20/03/2019 रोजी तक्रार अर्जदार श्री. ल्यूक मेन्डेस, वन संरक्षक दादर, वन संरक्षक कुलाबा व वनपाल श्री. र. स. मन्सूरी यांचे समवेत तक्रार अर्जदार यांनी दाखविलेल्या जागेची स्थळपहाणी केली असून, त्याचा अहवाल खालीलप्रमाणे.

सदर जागा ही माहिम धारावी पुल (Bridge) लगत असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकलेले आढळून आले. डॅब्रीज कोणी टाकले याबाबत स्थानिक रहीवाश्यांकडे चौकशी केली असता, डॅब्रीज हे रात्री उशिरा टाकण्यात येते. असे सांगण्यात आले. सद्यस्थितीत कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही.

परंतु सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॅब्रीज टाकले असल्याने ते पुढे पुढे सरकत तिवरांची झाडे जिथे आहेत. तिथपर्यंत पसरलेले आहे. भविष्यात डॅब्रीजचे प्रमाण वाढल्यास डॅब्रीज मुळे झाडांना मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा खंडीत होऊन, झाडे नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रथम त्याठिकाणचे डॅब्रीज हटविणे नितांत गरजेचे आहे. जेणे करुन झाडांना होणारा पाणी पुरवठा सुरळीत राहील. असे इकडील मत आहे.

इकडील अभिलेख पहाता, सदर जागा हि माहिम विभागातील असून, सदर जागा खाडीची आहे. त्याला भूकर क्रमांक देण्यात आलेला नाही.

वरीलप्रमाणे वस्तूस्थिती माननीयांच्या अवलोकनार्थ सादर.

सोबत :- स्थळदर्शक छायाचित्रे, गुगल नकाशा व जागेवरील पंचनामा सादर असे.

30/3/2019

**बी. व्ही. तोरस्कर**
**(परिरक्षण भूमापक)**

जिल्हाधिकारी कार्यालय
महसुल शाखा / नगर भुमापन शाखा
आवक क्रमांक :- 2578
दिनांक 1/4/2019
अधिक्षक

दिनांक- २०/३/२०१९

# पंचनामा

मा. जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालयातील परि भूमापक यांचे समक्ष, आम्ही खाली सह्याकरणारे पंचलोक, रा. माहीम पूर्व, माहीम-सायन (ब्रिज) पुला लगत आज दिनांक २०/३/२०१९ रोजी विचारले वरून सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की,

मा. अपर प्रधान मुख्य संरक्षक, कांदळवनकक्ष मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र - श्री. व्युक मेंडोस यांच्या तक्रारीचे अनुषंगाने प्रत्यक्ष जागेवर आलो असता व तक्रारदार यांनी दाखविलेल्या जागेची त्यांच्या समवेत स्थळ पहाणी केली असता माहीम-सायन पुलाच्या कडावीकडे मोठ्या प्रमाणात डेब्रीज टाकलेले आढळून आले. सदर डेब्रिज हे खोलवर कांदळवनांच्या झाडांच्या मुळापर्यंत गेलेले दिसून आले. सदर जागेचे वनाधिकारी यांनी जागेचे जी.पी.एस रिडींग घेतले व जागेचे फोटो तक्रारदार यांचे समक्ष काढण्यात आले म्हणून लिहून दिला पंचनामा

समक्ष

[signature] 20/3/2019
(बी.पी.तोरस्कर)
परि. भूमापक

[signature]
श्री. र. र. मन्नुरी
20/03/2019
वनपाल

[signature]
20/3/2019
www.BIPH.in

[signature]
व. र. घोडे
मुंबई

[signature]
व. र. कुलाबा
20/03/2019







